# राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ

(पिनॅकल मॉल,४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपिल**
**क्र. रामाआ-नाशिक/व्दितीय अपिल क्र.७१/२०२३/नाशिक**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री. मुश्ताक अहमद कमालुद्दीन, रा. स.नं. १०१, फ्लॅट नं. १६९, फार्मसी नगर, मालेगाव, ता. मालेगाव, जि. नाशिक - ४२३२०३ | उप अभियंता, पाणीपुरवठा विभाग, मालेगाव महानगरपालिका, मालेगाव, ता. मालेगाव, जि. नाशिक | शहर अभियंता, पाणीपुरवठा विभाग, मालेगाव महानगरपालिका, मालेगाव, ता. मालेगाव, जि. नाशिक |

## सुनावणी दिनांक – २६/०२/२०२६

**१. उपस्थिती –**

| अपीलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| अनुपस्थित | उपस्थित | अनुपस्थित | उपस्थित | उपस्थित |

**२. द्वितीय अपील अर्ज –**

(१) द्वितीय अपील अर्जाचा दिनांक : २०/१२/२०२२

(२) द्वितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : जन माहिती अधिकारी यांनी ३० दिवसंत माहिती किंवा निदान माहितीची वस्तुस्थिती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. परंतु जन माहिती अधिकारी यांनी तशी कार्यवाही केलेली नाही. मागणी केलेल्या अर्जाची माहिती व खरी नकल दिली नाही. प्रथम अपील आदेशानुसार देखील माहिती दिली नाही.

(३) द्वितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : जन माहिती अधिकारी यांचेवर दररोज रु.२५०/- प्रमाणे शास्ती लावावी. अपीलार्थीस मानसिक संताप व हानी बद्दल रु. ५०००/- व मालेगाव ते नाशिक आणि नाशिक ते मालेगाव प्रवासाचे रु.५००/- देण्याचे आदेश व्हावेत. मोफत माहिती मिळावी.

**३. माहिती अर्ज –**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : १९/०९/२०२२

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : १९/०९/२०२२

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : उपलब्ध माहितीनुसार आजपर्यंत

**(४) जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती :**

१) मालेगाव महानगरपालिकेच्या पाणी शुध्दीकरण केंद्रात मंदिराचे बांधकाम करण्यात आले असून सदर बांधकामाच्या परवानगीचे छायांकित प्रतीसह माहिती मिळावी. (२) सदर बांधकामाच्या कार्यारंभ आदेश, अंदाजपत्रक, देयक, टेस्टींग रिपोर्ट, निविदा पत्रिका, व्हाऊचर्स इत्यादीची छायांकित प्रतीसह माहिती मिळावी. (३) सदरचे काम हे ज्या निधीतून करण्यात आले त्याची छायांकित प्रतीसह माहिती मिळावी. (४) सदरचे काम ज्या ठेकेदार मार्फत करण्यात आले त्याची छायांकित प्रतीसह माहिती मिळावी. (५) सदर कामासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाकडून मंजूरी देण्यात आली असल्यास त्याची छायांकित प्रतीसह माहिती मिळावी. (६) मंदिर परिसरात भंडारा आयोजीत करण्यात येतो, सदर भंडाऱ्याच्या परवानगीची छायांकित प्रतीसह माहिती मिळावी. (७) सदर मंदिर हे जल शुध्दीकरण केंद्राच्या कंपाउंडच्या आत करण्यात आले असून कंपाऊंडच्या आत येण्यास ज्यांना परवानगी आहे त्याची व धार्मिक कामासाठी जागेचा वापर करण्यास परवानगी असल्यास त्या आदेशाची छायांकित प्रतीसह माहिती मिळावी.

**(५) जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :**
सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, पाणीपुरवठा विभाग, मालेगाव महानगरपालिका, मालेगाव, ता. मालेगाव, जि. नाशिक यांनी कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

**४. प्रथम अपील -**

| | | |
|---|---|---|
| (१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक | : | २०/१०/२०२२ |
| (२) प्रथम अपिल अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | : | २५/१०/२०२२ |
| (३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण | : | जन माहिती अधिकारी यांनी माहिती व कागदपत्राची संपुर्ण खरी नक्कल दिलेली नाही. |

**(४) अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :**
अपीलार्थी यांनी दाखल केलेल्या प्रथम अपील अर्जावर तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी तथा शहर अभियंता, पाणीपुरवठा विभाग, मालेगाव महानगरपालिका, मालेगाव, ता. मालेगाव, जि. नाशिक यांनी दि.२४/११/२०२२ रोजी सुनावणी घेवून त्यामध्ये जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, पाणी पुरवठा विभाग, मा.म.न.पा. यांनी अपीलार्थी यांचे दि.२०/०९/२०२२ रोजीचे मुळ अर्जातील उपस्थित मुद्यांची माहिती दिली नाही. अपीलार्थी यांना अभिलेखात उपलब्ध असलेली माहिती ०७ दिवसांत विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी, असे नमूद करुन प्रथम अपील निकाली काढण्यात आल्याचे दिसून येते.

**५. युक्तिवाद/लेखी खुलासा —**

१) विद्यमान जन माहिती अधिकारी - प्रथम अपील आदेशानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, पाणीपुरवठा विभाग, मालेगाव महानगरपालिका, मालेगाव, ता. मालेगाव, जि. नाशिक यांनी दि.१३/०२/२०२३ रोजीच्या पत्रान्वये अपीलार्थीस कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती पुरविली असल्याचे दिसून येते.

**६. निष्कर्ष —**

१) तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी तथा शहर अभियंता, पाणीपुरवठा विभाग, मालेगाव महानगरपालिका, मालेगाव, ता. मालेगाव, जि. नाशिक यांनी दि.२४/११/२०२२ रोजी सुनावणी घेवून प्रथम अपील आदेश पारित केल्याचे दिसून येते.

२) प्रथम अपील आदेशानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, पाणीपुरवठा विभाग, मालेगाव महानगरपालिका, मालेगाव, ता. मालेगाव, जि. नाशिक यांनी दि.१३/०२/२०२३ रोजीच्या पत्रान्वये अपीलार्थीस कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती पुरविण्यात आल्याचे दिसून येते.

३) अपीलार्थी द्वितीय अपील सुनावणीस अनुपस्थित असल्याने कोणती माहिती दिली नाही याचा उलगडा होवू शकला नाही.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

प्रस्तुत व्दितीय अपिल क्र.७१/२०२३/नाशिक निकाली काढण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

जावक क्र. [illegible]

दिनांक : 0 9 APR 2026